# ग्रामगीता महाविद्यालय,चिमूर

# सांस्कृतीक विभाग

## वार्षिक अहवाल

## सत्र:-२०१९-२०२०

महाविद्यालयाचे नाव :- ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर,ता.चिमूर,जि.चंद्रपूर

संपुर्ण पत्ता :- मु.पो. चिमूर,जि.चंद्रपूर

प्राचार्याचे नाव :-डॉ.अमार ए. धमानी

दुरध्वनी - ९४२२१२८४५३

सांस्कृतीक समीती:-

१) प्राचार्य डॉ. अमीर ए. धमानी - अध्यक्ष
२) प्रा. अरुण व्ही. पिसे - सदस्य
३) प्रा. प्रणाली टेंभुर्णे - सदस्य
४) प्रा. बिजनकुमार शिल - सदस्य
५) प्रा.एच. डी. आनंदे - सदस्य
६) प्रा.संदिप ए. मेश्राम - समन्वयक
७) सूरज सोपान देशकर, बि.कॉम.- तृतीय - विद्यार्थी प्रतिनिधी

**महाविद्यालयीन विद्यार्थी संख्या :-**

| अ.जा. | | अ. जमाती | | वि.भ.ज. | | इ.मा.व. | | वि.मा.व. | | खुले | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री | पु. | स्त्री |
| ४८ | ४१ | ८८ | ८१ | ११ | २४ | ६२ | ६४ | ०१ | ०३ | ०६ | ०४ | २१६ | २१७ |

ग्रामगीता महाविद्यालय चिमुर हे ग्रामीण भागातील महाविद्यालया पैकी एक महाविद्यालय जे वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कर्मभुमी असलेल्या परिसरात स्थापन झालेले आहे. या महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांचे अभ्यासक्रम राबवून शिक्षण दिले जाते. तसेच या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलांना, त्यांच्या गुणांना वाव मिळण्यासाठी सांस्कृतिक विभागामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजनासह वार्षिकोत्सव साजरा केला जातो.

अशाप्रकारच्या कार्यक्रमांतुनच विद्यार्थाची प्रतिभा अधिक खुलत जाऊन त्यांच्या आत्मविश्वास, व्यक्तिमतव विकास वाढीस लागण्यास महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग आपली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडीत आहे.

सत्र २०१९-२०२० मध्ये महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागामार्फत पुढील अनेक कार्यक्रमांचे आयोजन करुन विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यात आला.

- **दि. १२ ऑगस्ट २०१९ - राष्ट्रीय ग्रंथपाल दिन** ( डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती )

ग्रामगीता महाविद्यालय चिमुर येथे दि. १२ ऑगष्ट २०१९ रोजी बकरी इद निमित्त सार्वजनिक सुट्टी असत्यामूळे दि. १३ ऑगष्ट २०१९ रोजी डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती ' राष्ट्रीय ग्रंथपाल दिन' म्हणून साजरा करण्यात आला.


या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या हस्ते डॉ. एस. आर. रंगनाथन व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण केल्या गेले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची महाविद्यालयातील भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. तसेच याप्रसंगी मंचावर प्रा. अरूण पिसे, प्रा. खटी मॅडम यांनी सुध्दा विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व पटवून देत आपला विकास कसा साधावा यांचे मार्गदर्शन केले.

या कार्यमानिमित्त ग्रंथपाल प्रा. संदिप मेश्राम यांनी आपल्या प्रास्ताविकातून डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे ग्रंथालय व माहीतीशास्त्रतिल योगदान याविषयी विद्यार्थ्यांना माहीती दिली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बि.कॉम.-तृतीय चा विद्यार्थी सुरज देशकर यांनी केले.




➢ **दि. १५ ऑगष्ट २०१९- स्वातंत्र दिन**

दि. १५ ऑगष्ट २०१९ रोज गुरुवारला ग्रामगीता महाविद्यालय चिमूर येथे ७२ व्या स्वातंत्र दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या राष्ट्रीय ध्वज फडकवून विद्यार्थ्यासह सामूहिक मानवंदना देण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत व भाषणे दिलीत. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी बहुसंख्यंने उपस्थित होते.



> ➢ **दि. ५ सप्टेंबर २०१८ - ' शिक्षक दिन'**

ग्रामगीता महाविद्यालय चिमुर येथे दि. ०५ सप्टेंबर २०१९ ला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती ' शिक्षक दिन' म्हणून साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांनी भुषवून विद्यार्थ्यांना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या निवनकार्यावर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्व पटवून दिले. या कार्यक्रमानिमित्त प्रमुख वक्ते म्हणून प्रा. एस.एन. पठान सर सेवानिवृत्त प्राचार्य बाबूराव मडसवी कॉलेज देसाईगंज,वडसा यांना आंमत्रित करण्यात आले होत. त्यांनी आपल्या अनमोल मार्गदर्शनातून विद्यार्थी व शिक्षकांच्या नात्यातील प्रेमभाव ऊलगडून विद्यार्थ्यासमोर मांडले. य प्रसंगी दरवर्षीप्रमाणे बि.ए., बि. कॉम व बि. एस. स्सी शाखेतुन प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरीत करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रणाली टेंभूर्णे मॅडम यांनी केले तर सुत्रसंचालन बि. एस.स्सी. अंतीमचा विद्यार्थि आकिब शेख व आभार प्रदर्शन प्रा. संदिप मेश्राम यांनी केले. यानिमित्त महाविद्यालयातील समस्त प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



> ➢ **दि. ०२ ऑक्टोंबर २०१९ - महात्मा गांधीं जयंती**

दि. ०२ ऑक्टोंबर २०१९ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती दिनाचा कार्यक्रम सांसकृतिक विभाग व महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे संयुक्तरित्या साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. हुमेश्वर आनंदे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. अरूण पिसे, प्रा. कु. मंगला ठाकरे मॅडम व प्रा. संदिप मेश्राम उपस्थित होते.

या प्रसंगी प्रा. अरूण पिसे यांनी आपल्या प्रास्ताविकपर मार्गदर्शनातून महात्मा गांधी यांच्या जिवनचरित्राविषयी मार्गदर्शन केले. तर प्रा.संदिप मेश्राम यांनी आपल्या मार्गदर्शनातुन महात्मा गांधीचे भारताच्या स्वतंत्रता आंदोलनातील योगदान स्वातात्र्यासाठी कसे मोलाचे ठरले याविषयी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्यार्थी सुरज देशकर याने केले तर आभार प्रा. कु. मंगला ठाकरे यांनी मानले.




➢ **११ ऑक्टोंबर २०१९ - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज निर्वाण दिन**


दि. ११ ऑक्टोंबर २०१९ रोज शुक्रवारला ग्रामगीता महाविद्यालयात वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या निर्वाण दिनी प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या हस्ते राष्ट्रसंताच्या प्रतिमेला मात्यार्पण करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची चिमुर परिसरामध्ये केलेल्या कार्याचा गुणगौरव केला. कार्यक्रमाला विद्यार्थी व महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद उपस्थित होते.

➢ **दि. १५ ऑक्टोंबर २०१९ - वाचन प्रेरणा दिन**

वाचन माणसाला माठ आणि सुसंस्कारी बनविते. अनेकांच्या हातातून फार माठ्या गोष्टी घडुन आल्यात त्या वाचनामुळेच वाचानाचे महत्व पटवून देण्याकरीता ग्रामगीता महाविद्यालयात प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या मार्गदर्शनात ग्रंथालय विभागाचे प्रमुख प्रा. संदिप मेश्राम यांच्या कडून वाचन प्ररणा दिन हा डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम चांचा जन्मदिन दि. १५ ऑक्टोबर २०१९ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून बोलत असतांना कलामांनी पाहिलेले उंच उडण्याचे स्वप्न विद्यार्थ्यांनी सुध्दा बघावयास पाहिजे. मोठी स्वप्ने बघणारेच मोठे होतात म्हणून कलामांचे जिवनचरित्र वाचले पाहीजे असे मज व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा. संदिप मेश्राम यांनी आपल्या मार्गदर्शनात आजच्या तरूण पिठीने डॉ. कलाम यांनी भारताला महासत्ता बनविण्याचे जे स्वप्न दाखविले ते साकार बरण्याचा ध्यास तरूणांनी बाळगावा तसेच युवकांनी वाचन प्रेरणा दिनी 'दर महीना निदान एक पुस्तक वाचन' असा संकल्प करावा असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. युवराज बोधे तर प्रास्ताविक प्रा.कु.मंगला ठाकरे मॅडम यांनी कले आणि आभारप्रदर्शन प्रा. सुमेध वावरे यांनी केले.



➢ **दि. १४ नोव्हेंबर २०१९ - पं. जवाहरलाल नेहरू जयंती**

ग्रामगीता महाविद्यालय चिमूर येथे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांची १३० वी जंयती 'बालक दिन' म्हणून प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या मार्गदर्शनात दि. १४ नोव्हेंबर २०१९ रोजी साजरी करण्यात आली.

या प्रसंगी सांस्कृतीक विभागाव्दारे पं. जवाहरलाल नेहरू जंयती चा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येउन पं. नेहरू यांच्या प्रतीमेला प्रा. हूमेश्वर आंनदे यांनी माल्यार्पण केले. प्रा. संदिप मेश्राम यांनी उपस्थीत परिक्षार्थी विद्यार्थ्यांना पं. जवाहरलाल नेहरू यांच्या जंयती दिनाच्या शुभेच्छा देउन पं नेहरूंच्या जिवनावर थोडक्यात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा. खटी मॅडम, प्रा. सरताज शेख, प्रा. प्रज्ञा खोब्रागडे, प्रा. मृणाल वऱ्हाडे, प्रा. बिजनकुमार शिल, प्रा. रोहीत चांदेकर, प्रा. विवेक माणीक, प्रा. नागेश ढोरे, प्रा. सूमेध वावरे, प्रा. समीर भेलावे व इतर सर्व प्राध्यापक उपस्थित होते.



## ➢ दि. २६ नोव्हेंबर २०१९- भारतीय संविधान दिन

दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोज मंगळावारला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान सम्मान दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. हुमेश्वर आनंदे, प्रमुख अतिथि म्हणून प्रा. संदिप मेश्राम, अरूण पिसे, वरदा खटी उपस्थित होते.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रणाली टेंभुर्णे यांनी केले. संविधान दिनाच्या औचित्याने प्रा. अरुण पिसे यांनी उपस्थित विद्यार्थ्यासमक्ष संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन केले तर प्रा. संदिप मेश्राम यांनी आपल्या मार्गदर्शनात संविधान निर्मितीचा इतिहास व भारतीय नागरिक म्हणून त्यांची संविधानिक मूलभूत कर्तव्य विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या प्रा. वरदा खटी मॅडम यांनी संविधानाने आपल्याला अधिकार बहाल केलेत त्याचप्राणे जबाबदारी व कर्तव्य ओळखून राष्ट्रनिर्मितीला योगदान द्यावेत असे मत व्यक्त केलेत. कार्यक्रमाला अध्यक्ष लाभलेले प्रा. हुमेश्वर आनंदे यांनी अनेक अडचणी प्रसंगी संविधानाचे माध्यमातून आपल्या देशांनी मार्ग काढलेले आहेत. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नसुन जबाबदारीने आचरण करून प्रत्येकाने संविधानाचा आदर करावा असे मत व्यक्त केलेत. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. बिजनकुमार शिल यांनी केलेत तर आभार प्रदर्शन प्रा. विवेक माणिक यांनी केले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## ➢ दि. २८ नोव्हेंबर २०१९ - महात्मा जोतिराव फुले स्मृतिदिन

दि. २८ नोव्हेंबर २०१९ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतिदिनाचा कार्यक्रम प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना महात्मा फुले यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यामुळेच आजच्या विद्यार्थी आपली उन्नती साधु शकला असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून प्रा. सुमेध वावरे, प्रा. मेहमूद पठान, प्रा. मंगला ठाकरे मॅडम उपस्थित होते. या प्रसंगी प्रा. सुमेध वावरे यांनी महात्मा फुले यांच्या जिवनावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर प्रा. कु. मंगला ठाकरे यांनी सुध्दा फुले दाम्पत्यांचे जिवन कार्य प्ररणादायी असून विद्यार्थ्यांनी फुल्यांचे विचार आत्मसात करावे असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बिजनकुमार शिल यांनी केले तर आभार प्रदर्शन रोहीत चांदेकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रवंदना घेऊन करण्यात आली.




## ➢ दि. ०६ डिसेंबर २०१९ - महापरिनिर्वाण दिन

महाविद्यालयात दि. ०६ डिसेंबर २०१९ रोज शुक्रवारला प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या मार्गदर्शनात महापरिनिर्वाण दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंबी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. मेहमूद पठान लाभले होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अरूण पिसे, प्रा. नागेश ढोरे,

प्रा. प्रज्ञा खोब्रागडे हे उपस्थित होते. याप्रसंगी सर्व पाहुण्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक राजकीय, शैक्षणिक कार्यविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले प्रा. प्रज्ञा खोब्रागडे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्यार्थी जिवनाजील अनेक अडचणींची जाणिव विद्यार्थ्यांना करून देत विद्यार्थ्यांनी त्यातून प्रेरणा घेऊन परिस्थितीचा बाहु करू नये असे मार्गदर्शन केले. विचार प्रगल्भ स्वरूपाचे असून ते स्वीकरण्याशिवाय तरणोपाय नाही असा संदेश दिला.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. बिजनकुमार शिल तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. युवराज बोधे यांनी केले. याप्रसंगी महाविद्यालयातील समस्त प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.




- **दि. ०३ जानेवारी २०२० - क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जंयती**

दि. ०३ जानेवारी २०२० रोजी सावित्रीबाई फुले जंयती महाविद्यालयात साजरी करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या जंयतीच्या औचित्याने महाविद्यालयात करिअर मार्गदर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या निमित्ताने मंचावर प्रा. संदिप मेश्राम, प्रा. निलेश ठवकर, यश सेंटर च्या राखी बोराडे, मुण्धा कानगे, संतोषी डोनीवार उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या प्रास्तविकाला आपले मनोबत व्यक्त करतांना प्रा. संदिप मेश्राम यांनी सावित्रीबाई फुले यांनी हालअपेष्टा, प्रस्तापित वर्गाकडुन होणारा अपमान सहन करून स्त्री शिक्षणाची धुरा

आपल्या अंगावर घेत सामाजिक दायित्व पार पाडले असे मार्गदर्शन केले. तर राखी बोराडे मॅडम यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सावित्रीच्या लेकी आज शिक्षण घेउन प्रगतीपथावर मार्गक्रमण करीत असून त्यांना करिअरच्या कोणकोणत्या संधी उपलब्ध आहेत याबाबद प्रशिक्षण दिले.

या प्रसंगी मुग्धा कानगे, यश सेंटर बल्लारपूर यांनी विद्यार्थ्यांनी आपले कार्यक्षेत्र निवडत असताना प्रथमता आपल्या व्यक्तीमत्त्वाला साजेशा क्षेत्रात करिअर कसा ठरता येईल या विषयी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बि. एस. सी. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी स्नेहा गणविर तर आभार प्रदर्शन सुमेध वावरे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. विवेक मानिक करिअर समुपदेशन समितीचे समन्वयक यांनी केले.

# ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर

## वार्षिकोत्सव - २०१९-२०२०

मानवी जिवनात जन्मापासुन त्याच्या हळूवार विकासाची प्रक्रिया सुरु होत असते. त्याचा परिपुर्ण विकास घवून असेल तर तो,शाळा महाविद्यालयीन शिक्षणात महाविद्यालयीन शिक्षणाला सुरवात करतांना अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या आंतरीक गुणांचा सुद्धा विचार केला जातो. व हे आंतरीक गुण बाहेर काढुन त्यांचा विकास घडवून आणावा लागतो. अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी महाविद्यालयीन अनेक कार्यक्रम आयोजीत केले जातात त्याचाच एक भाग म्हणजे 'वार्षिकोत्सव कार्यक्रम' ज्याची विद्यार्थी आतुरतेने वाट पाहत असतात.

ग्रामगीता महाविद्यालयात चिमूर, ता. चिमूर येथे दि. २२ जाने. २०२० ते २८ जाने. २०२०चे कालावधीत वार्षिकोत्सव कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. हया कार्यक्रमाचा अहवाल खालीलप्रमाणे

**क्रिडा स्पर्धा:**

वार्षिकोत्सव कार्यक्रम निमीत्ताने दि. २२ जाने. २०२० ते २५ जाने. २०२० या कालावधीत क्रिडा स्पर्धा आयोजीत करण्यात आल्यात. त्यामध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, रनींग, कबड्डी, लांब उडी, स्लो सायकलींग, लगोरी, बुद्धीबळ अशा अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेत. शारिरीक शिक्षण विभागप्रमुख डॉ. संदिप सातव यांच्या मार्गदर्शनात हया सर्व स्पर्धा आयोजीत करण्यात आल्यात.

| | | |
|---|---|---|
| • क्रिकेट स्पर्धा मुले | प्रथम विनर | बि.एस.सी भाग ३ |
| | द्वितीय विनर | बि.एस.सी भाग १ |
| • क्रिकेट स्पर्धा मुली | प्रथम विनर | बि.ए. भाग ३ |
| | द्वितीय विनर | बि.एस.सी भाग २ |
| • व्हॉलीबॉल स्पर्धा मुले | प्रथम विनर | बि.एस.सी भाग १ |
| | द्वितीय विनर | बि.एस.सी भाग ३ |
| • व्हॉलीबॉल स्पर्धा मुली | प्रथम विनर | बि.एस.सी. भाग १ |
| | द्वितीय विनर | बि.एस.सी भाग २ |

| | | |
|---|---|---|
| • कबड्डी स्पर्धा मुले | प्रथम विनर | बि.ए. भाग १ |
| | द्वितीय विनर | बि.ए. भाग २ |
| • कबड्डी स्पर्धा मुली | प्रथम विनर | बि.एस.सी. भाग १ |
| | द्वितीय विनर | बि.ए. भाग १ |
| • रस्साखेच स्पर्धा मुले | प्रथम विनर | बि.ए. भाग ३ |
| | द्वितीय विनर | बि.ए. भाग २ |
| • रस्साखेच स्पर्धा मुली | प्रथम विनर | बि.एस.सी. भाग २ |
| | द्वितीय विनर | बि.एस.सी. भाग ३ |
| • रनींग १००मी. स्पर्धा मुले | प्रथम विनर (आशिष नन्नावरे) | बि.ए. भाग २ |
| | द्वितीय विनर (प्रविण जिवतोडे) | बि.ए. भाग २ |
| • रनिंग ४००मी. स्पर्धा मुले | प्रथम विनर (प्रविण जिवतोडे) | बि.ए. भाग २ |
| | द्वितीय विनर (प्रदिप दुधनकर) | बि.ए. भाग ३ |
| • रनींग १००मी. स्पर्धा मुली | प्रथम विनर (कु. राणी सोनुले) | बि.एस.सी भाग १ |
| | द्वितीय विनर (कु. अंकिता निखारे) | बि.ए. भाग १ |
| • रनिंग ४००मी. स्पर्धा मुली | प्रथम विनर (कु. राणी सोनुले) | बि.एस.सी. भाग १ |
| | द्वितीय विनर (कु. जयश्री घरत) | बि.ए. भाग १ |
| • लगोरी स्पर्धा मुली | प्रथम विनर | बि.ए. भाग २ |
| | द्वितीय विनर | बि.ए. भाग १ |

| | | |
|---|---|---|
| • स्लो सायकलींग मुले | प्रथम विनर<br>(पंकज पाटील) | बि.कॉम. भाग ३ |
| | द्वितीय विनर<br>(विक्की गौरकार) | बि.कॉम. भाग ३ |
| • स्लो सायकलींग मुली | प्रथम विनर<br>(कु. कोमल बालचन्ने) | बि.एस.सी. भाग १ |
| | द्वितीय विनर<br>(कु. राणी कुबडे) | बि.एस.सी. भाग १ |
| • गोळा फेक स्पर्धा मुले | प्रथम विनर<br>(गणेश दहिकर) | बि.एस.सी. भाग ३ |
| | द्वितीय विनर<br>(सुरज देशकर) | बि.कॉम. भाग ३ |
| • गोळा फेक स्पर्धा मुली | प्रथम विनर<br>(कु. जयश्री घरत) | बि.ए. भाग १ |
| | द्वितीय विनर<br>(कु. नुयेरा रामटेके) | बि.एस.सी. भाग २ |
| • भाला फेक स्पर्धा मुले | प्रथम विनर<br>(आशिष ढोणे) | बि.ए. भाग २ |
| | द्वितीय विनर<br>(आशिष नन्नावरे) | बि.ए. भाग १ |
| • भाला फेक स्पर्धा मुली | प्रथम विनर<br>(कु. रोहीणी खिरटकर) | बि.एस.सी. भाग १ |
| | द्वितीय विनर<br>(कु. प्रतिक्षा कामडी) | बि.एस.सी. भाग २ |
| • बुद्धीबळ स्पर्धा मुले | प्रथम विनर<br>(लखन मेश्राम) | बि.एस.सी. भाग १ |
| | द्वितीय विनर<br>(प्रविण पोडीशेट्टी) | बि.एस.सी. भाग २ |

अशाप्रकारे क्रिडा स्पर्धा घेण्यात आल्यात प्रा. कु. सरताज शेख, प्रा. कु. प्रज्ञा खोब्रागडे, प्रा. मानीक सर, प्रा. कु. मेहरकुरे यांनी सहकार्य केलेत.

**अंतर्गत स्पर्धा :-** अंतर्गत स्पर्धामध्ये अनेक प्रकारच्या स्पर्धा आयोजीत करण्यात आल्यात.

१) **पाष्टर स्पर्धा :** या स्पर्धेत १२ विद्यार्थी सहभागी झालेत. स्पर्धेअंती प्रथम पारितोषीक प्रविण पोडीशेट्टी बि.एस.सी. भाग २ व द्वितीय पारितोषीक स्वरुप बडगे बि.एस.सी. भाग ३ यांना देण्यात आले.

२) **पदार्थ सजावट स्पर्धा :** या स्पर्धेत एकुण ०९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्रथम विजेता कु. आचल सहारे बि.एस.सी. भाग २ व उपविजेता स्वरुप बडगे बि.एस.सी. भाग ३ यांना नोंदविण्यात आला.

३) **पुष्पसजावट स्पर्धा :** या स्पर्धेत एकुण १० विद्यार्थी सहभाग झालेत. स्पर्धेअंती कु. निता बावणे बि. एस.सी. भाग ३ हिला प्रथम व कु. रानी सहारे बि.एस.सी. भाग ३ हिला द्वितीय पारितोषीक देण्यात आले.

४) **रांगोळी स्पर्धा : (फ्री हॅन्ड)** या स्पर्धेत एकुण १२ विद्यार्थीनी सहभागी झाल्यात प्रथम पारितोषीक कु. मणिषा कामडी बि.एस.सी. भाग ३ व द्वितीय कु. माहिणी खाटीक बि.एस.सी. भाग ३ हिला देण्यात आलेत.

५) **रांगोळी स्पर्धा टिंबाची :** या स्पर्धेत एकुण १० विद्यार्थीनी सहभागी झाल्यात. प्रथम विजेता कु. वर्षा सोनवाणे बि.एस.सी. भाग १ व उपविजेता कु. जान्हवी बांगडे बि.एस.सी. भाग १ हिला घोषीत करण्यात आलेत.

६) **कोलाज स्पर्धा :** या स्पर्धेत एकुण ११ विद्यार्थी सहभागी झालेत प्रथम विजेता कु राखी कुबडे बि.एस. सी. भाग १ व उपविजेता कु. रानी सहारे बि.एस.सी. भाग ३ हिला घोषीत करण्यात आले.

७) **कवी संमेलन :** या स्पर्धेत एकुण ११ विद्यार्थी सहभागी झालेत स्पर्धेअंती प्रथम विजेता कु. स्नेहा गनविर बि.एस.सी. भाग १ व उपविजेता कु. निता बावणे बि.एस.सी. भाग ३ हिला घोषीत करण्यात आले.

८) **आनंद मेळावा :** या स्पर्धेत एकुण १४ विद्यार्थीनीने सहभाग नोंदविला. स्पर्धेअंती प्रथम विजेता कु. आचल सहारे बि.एस.सी. भाग २ व उपविजेता कु. प्राची घोडमारे बि.एस.सी. भाग २ हिला घोषीत करण्यात आले.

**सांस्कृतीक स्पर्धा :-**

दि. २७ जाने. व २८ जाने. २०२० रोजी महाविद्यालयात सांस्कृतीक स्पर्धा आयोजीत करण्यात आल्यात. या वार्षिकात्सव कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ दि. २७ जाने. २०२० रोजी सकाळी १०.००वा. करण्यात आला. हया उद्घाटन समारंभाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. अमीर धमानी उद्घाटक म्हणून मा. प्रकाश चं. सपकाळ (उपविभागीय अधिकारी, चिमूर) प्रमुख अतिथी म्हणून मा.प्रा.कार्तीक पाटील (राष्टसंत तुकडोजी महाविद्यालय, चिमूर) उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धेपासुन खुपच दुर आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थांनी स्वत:मधील उनिवांचा बाहु न बागळता स्पर्धेमध्ये सहभागी व्हा स्पर्धापरिक्षांचा माध्यमातून आपले भविष्य घडविण्याचा प्रयत्न करावा असे मत व्यक्त केले.

अघ्यक्षीय मार्गदर्शनात प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांनी आपल्या महाविद्यालयात आता अनेक सोयीसुविधा उपलब्ध झालेल्या आहेत. आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी अनेक विद्यापीठीय स्पर्धामध्ये सहभागी होवून प्राविण्य प्राप्त करीत असतात. यशस्वी होण्याचे अनेक मार्ग आहेत. आपल्याला जो मार्ग चांगला वाटतो त्या मार्गाने जावून आपला विकास साधावा असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुशिला गजभिये यांनी केले.

## सांस्कृतीक स्पर्धा निमीत्ताने खालील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

१) **गितगायन स्पर्धा :** या स्पर्धेमध्ये एकुण १५ विद्यार्थी सहभागी झालेत. परिक्षणअंती मनोज मुरलीधर वाकडे बि.कॉम. भाग ३ याला प्रथम व कु. योगेश्वरी बारसागडे हिला द्वितीय पारितोषीक देण्यात आले.

२) **वादविवाद स्पर्धा :** या स्पर्धेत एकुण १२ विद्यार्थी सहभागी झालेत 'सामाजिक माध्यमांचे तरुणांना होणारे फायदे व तोटे' हा विषय स्पर्धेकरीता ठेवण्यात आला. स्पर्धेअंती प्रथम विजेता स्परुप बडगे बि.एस.सी. भाग ३ व उपविजेता प्रविण पोडीशेट्टी बि.एस.सी. भाग २ याला घोषीत करण्यात आले.

३) **फॅन्सी ड्रेस स्पर्धा :** या स्पर्धेकरीता पारंपारीक वेशभुषा ही थीम ठेवण्यात आली होती. व्यक्तीगत वेशभुषा मध्ये प्रथम मनोज वाकडे बि.कॉम. भाग ३ व द्वितीय प्रणय वाघमारे बि.एस.सी. भाग ३ यांना घोषीत करण्यात आले.

सांघीक वेशभुषा मध्ये प्रथम कु. आचल सहारे बि.एस.सी. भाग २ व अमर सहारे बि.कॉम. भाग ३ हयांना व द्वितीय कु. प्रणिता पवार बि.एस.सी. भाग २ व सुरज देशकर बि.कॉम. भाग३ यांना घोषीत करण्यात आले.

४) **वक्तृत्व स्पर्धा :** हया स्पर्धेकरीता ' विद्यार्थी जिवनशैलीमध्ये क्रिडा व शारिरीक शिक्षणाचे महत्व' हा विषय ठेवण्यात आला. स्पर्धेमध्ये एकुण १६ विद्यार्थी सहभागी झालेत. परिक्षणाअंती प्रथम विजेता प्रविण पोडिशेट्टी बि.एस.सी. भाग २ व उपविजेता स्वरुप बडगे बि.एस.सी. भाग ३ यांना घोषीत करण्यात आले.

५) **वनमिनीट शो स्पर्धा :** या स्पर्धेत एकुण १० विद्यार्थी सहभागी झालेत. स्पर्धेअंती प्रथम विजेता कु. राणी सहारे बि.एस.सी. भाग ३ व उपविजेता स्वरुप मेश्राम ....... याला घोषीत करण्यात आले.

६) **नृत्य स्पर्धा :** कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांसाठी नृत्य स्पर्धा आयोजीत करण्यात आल्यात. यामध्ये नृत्य प्रकारानुसार एकल नृत्य, समूह नृत्य, स्क्रीप्ट असे तीन प्रकार पाडण्यात आले.

- **एकल नृत्य :** एकल नृत्य प्रकारात एकुण ०७ स्पर्धक सहभागी झालेत. परिक्षणाअंती प्रथम विजेता कु. लक्ष्मी नान्हे बि.ए. भाग १ व उपविजेता कु. पुनम चन्ने बि.एस.सी. भाग १ यांना घोषीत करण्यात आले.
- **समुह नृत्य :** या प्रकारात एकुण १० समुह सहभागी झालेत. परिक्षणाअंती हर्षल चौखे ग्रुप बि.ए. भाग ३ यांना विजेता व कु. उज्वला भानारकर ग्रुप बि.कॉम. भाग २ यांना उपविजेता घोषीत करण्यात आले.
- **स्क्रीप्ट नृत्य :** या नृत्यप्रकारात एकुण ०२ समुह सहभागी झालेत. परीक्षणाअंती प्रथम विजेता कु. चेतना वाकडे ग्रुप बि.एस.सी. भाग २ व उपविजेता कु. माधुरी वानखेडे ग्रुप बि.एस.सी. भाग १ यांना घोषीत करण्यात आले.

अशाप्रकारे वार्षिकोत्सव कार्यक्रमात अनेक प्रकारच्या सांस्कृतीक स्पर्धा घेण्यात आल्यात. विद्यार्थ्यांनी उत्फुर्तपणे भाग घेवून वार्षिकोत्सव कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला.

# समारोपीय कार्यक्रम

## पारीतोषिक वितरण

दि. २७ जाने. ते २९ जाने. २०२० असे दोन दिवस वार्षिकोत्सव कार्यक्रमात सांस्कृतीक स्पर्धा घेण्यात आल्यात. सरतेशेवटी दि. २८ जाने. २०२० रोजी सायंकाळी ३.०० वाजता समारोपीय कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्य अमीर धमानी व प्रमुख अतीथी म्हणून मा. डॉ. सुरेश बाकरे प्राचार्य श्री. ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव, प्रा. डॉ. गजानन कोर्तलवार मराठी विभाग प्रमुख श्री. ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव उपस्थित होते.

प्रथमत: वार्षिकोत्सव कार्यक्रम प्रसंगी आयोजीत केलेल्या क्रिडा व सांस्कृतीक स्पर्धांचे पारितोषीक वितरण अतीथीच्या हस्ते करण्यात आले. प्रमाणपत्रे व मानचिन्ह देवून यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

समारोपीय कार्यक्रमात प्रमुख अतिथी डॉ. बाकरे सर मार्गदर्शन करतांना कुठलीही गोष्ट साध्य करतांना स्वत:ध्ये जिद्द आणि चिकाटी असणे महत्वाचे असते. जिद्द आणि चिकाटीच्या आधारावर अनेक व्यक्ती यशस्वी होवुन आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांने कुठलेही काम हातात घेतल्यानंतर ते जिद्दीने शेवट नेण्याचा प्रयत्न करावा असे मत व्यक्त केले.



प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करतांना मा. डॉ. गजानन कोर्तलवार यांनी अनेक प्रकारचे नवनविन उदाहरणे सांगुन विद्यार्थांना हास्यविनोदात समवून टाकले. आपल्या अनुभवातुन मिळालेल्या उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आंतरिक प्रेरणा देण्याचे महत्वाचे कार्य केलेत.

अध्यक्ष म्हणुन उपस्थीत असलेले प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांनी मनुष्य हा नेहमीच विद्यार्थीच असतो. लहान असतांना आईवडीलांचा उपदेशातून शिक्षण, शाळेत प्रवेश केल्यानंतर शिक्षकांच्या सानिध्यात शिक्षण, आसपासच्या समाजात अनेक घटना घडत असतात. हया घटनासुद्धा आपल्या अनपेक्षीतपणे काहीना काही आपल्याला शिकवुन जात असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणतीही नविन गोष्ट असो ती शिकायचा प्रयत्न केलाच पाहीजे. असे मत व्यक्त केले.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संदिप सातव यांनी केलेत. व आभारप्रदर्शन कार्यक्रम समन्वयक प्रा. कु. सुशिला गजभिये यांनी केलेत. समारोपीय कार्यक्रमानंतर विद्यार्थांना स्नेहभोजन देण्यात आले. व अशाप्रकारे वार्षिकोत्सव कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. हया सर्व कार्यक्रमा प्रसंगी प्रा. अरुण पिसे, प्रा.

मेहमुद पठाण तसेच सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीसुद्धा सहकार्य केलेत. कार्यक्रमादरम्यान सर्वाचे मला सहकार्य लाभले त्या सर्वांचे आभार मानतो.

**दि. २७ फेब्रुवारी २०२० - मराठी राजभाषा दिन**

ग्रामगीता महाविद्यालय चिमुर येथे प्रसिध्द लेखक, कवी, नाटककार विष्णू वामन शिरवाडकर यांची जंयती मराठी राजभाषा गैरव दिन म्हणून साजरी करण्यात आली. मराठी राजभाषा दिनानिमित्त आयोजीत कार्यक्रमाला न्यू राष्ट्रीय महाविद्यालय चिमूर येथील शिक्षीका अश्विनी रोकडे प्रमूख पाहूण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना मराठी अस्मिता व ते टिकवून ठेवण्यासाठी माय मराठीचे किती महत्व आहे हे अनेक उदाहरणतून पटवून सांगीतले. ज्या भाषेच्या सहवासात लहानाचे मोठे झालोत त्याच भाषेच्या अंतास आपण स्वत: कराणीभुत ठरणार तर नाही अशी खंतही त्यांनी याप्रंसगी व्यक्त केली.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत असतांना वरदा खटी यांनी प्रत्येक भाषेचं महत्व आहेच पण जेव्हा स्वाभिमानाने आम्ही मराठी भाषेला व्यवहारातही वापरणे अगत्याचे ठरते असे मत व्यक्त केले. या प्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून योगीता गजभिये, सुशिला गजभिये उपस्थित होते. प्रास्ताविक मंगला

ठाकरे यांनी करून मराठी भाषा गौरव दिनाचे महत्व व काळानूरूप त्याची गरज या विषयी मार्गदर्शन केले. ग्रंथपाल प्रा. संदिप मेश्राम यांनी दोन  दिवसीय ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन केले. या ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या हस्ते करण्यात आले.

अशा प्रकारे महाविद्यालयाच्या सांस्कृतीक विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कला, गुणांना वाव मिळण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व सुधारण्यासाठी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करून हे महाविद्यालय सतत विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करीत असते.

| | | |
|---|---|---|
| सांस्कृतीक विभाग समन्वयक | वार्षिकोत्सव कार्यक्रम समन्वयक | प्राचार्य |
| ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर | ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर | ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर |

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur